# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.03.2026** **वारः गुरुवार**

---

1. सुधारित उडान योजना राबवण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. दळणवळण पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यासाठी आणि 'कवच' प्रणालीच्या विस्तारासाठी रेल्वेची 1200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांना मंजुरी
3. पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकारद्वारे सर्व पक्षीय बैठकीचं आयोजन
4. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित आणि
5. पहिल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धांना रायपूरमध्ये आरंभ

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय</u>**

आगामी दहा वर्षांच्या कालावधीत सुधारित उडान योजना राबवण्यासाठी काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. ही योजना 2026-27 ते 2035-36 या कालावधीत राबवली जाणार असून, या योजनेसाठी 28 हजार 840 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बातमीदारांना ही माहिती दिली. वापरात नसलेल्या धावपट्ट्यांचे रूपांतर करून 100 विमानतळ विकसित केली जाणार आहेत. यामुळे दुय्यम आणि तृतीय श्रेणी शहरांचा आर्थिक विकास, व्यापार आणि पर्यटन वाढेल तसेच स्वस्त हवाई प्रवासाला चालना मिळेल असंही वैष्णव यांनी म्हटलं आहे. ट्रॅकिंग, व्हिसा, परदेशी नागरिक नोंदणी तसंच स्थलांतर व्यवस्थेला यावर्षी 1 एप्रिलपासून मार्च 2031 पर्यंत म्हणजेच पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. तर 2035 पर्यंत सकल देशांतर्गत उत्पादनाची 'उत्सर्जन तीव्रता' 47 टक्क्यांनी कमी केली जाईल. फेब्रुवारी 2026 पर्यंत देशाने 52 पूर्णांक 57 टक्के 'अ-जीवाश्म इंधन क्षमता' साध्य केली असून, निर्धारित कालमर्यादेच्या पाच वर्षे आधीच हे उद्दिष्ट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

**<u>रेल्वे</u>**

रेल्वेने आपल्या दळणवळण पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यासाठी आणि अनेक विभागांमध्ये 'कवच' स्वयंचलित संरक्षण प्रणालीचा विस्तार करण्यासाठी 1200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. प्रगत फायबर संप्रेषण प्रणाली आणि आधुनिक सुरक्षा यंत्रणांच्या माध्यमातून रेल्वेचं जाळं मजबूत करणे, हा या प्रकल्पांचा उद्देश असल्याचं रेल्वे मंत्रालयाने म्हटलं आहे. सुरक्षा उपायांचा संदर्भ देताना, मंत्रालयाने सांगितले की ही प्रणाली स्वदेशी असून दोन गाड्यांमधील अपघात टाळण्यासाठी विकसित करण्यात आली असून तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकमधील 548 किलोमीटरच्या मार्गांवर तसच गुजरातमधील राजकोट आणि भावनगर विभागांमध्ये तैनात केली जाणार आहे. ही प्रणाली गंभीर परिस्थितीत आपोआप ब्रेक लावून रेल्वे गाड्यांची धडक टाळण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

**<u>तृतीयपंथी विधेयक</u>**

राज्यसभेने मंजुरी दिल्यानंतर संसदेने 'तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण सुधारणा विधेयक, 2026' संसदेत मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकाद्वारे तृतीयपंथी या संवर्गाची पुनर्व्याख्या करण्याचा, स्व-कल्पित लैंगिक ओळखीची तरतूद काढून टाकण्याचा आणि अनेक सामाजिक-सांस्कृतिक ओळखी तसेच ट्रान्समॅस्क्युलिन व्यक्तींना म्हणजे जन्मतः स्त्री म्हणून ओळखल्या गेल्या, पण स्वतःची ओळख पुरुषत्वाकडे कडे झुकणारी वाटते अशा व्यक्तिना त्याच्या कक्षेतून वगळण्यात आलं आहे. तृतीयपंथियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्यावरील भेदभाव थांबवण्यासाठी सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले असल्याचं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी म्हटलं आहे.

**अधिवेशन**

राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन, कायदा-सुव्यवस्थेचं बळकटीकरण, गुन्हेगारी नियंत्रण, सायबर गुन्ह्यांवर आळा आणि न्यायव्यवस्थेतील सुधारणा या सर्व क्षेत्रांत राज्य शासन व्यापक पातळीवर काम करत ठोस प्रगती साधत आहे. राज्यात गुन्हेगारीत घट झाली असून न्याय व्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत विरोधी पक्षांच्या वतीनं मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला सविस्तर उत्तर देताना सांगितलं.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणलं जाईल असंही त्यांनी ठामपणे सांगितलं.

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक 2026 विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमतानं मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. पावसाळी अधिवेशन 22 जूनपासून मुंबईत सुरू होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेत सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी तर विधानसभेत अध्यक्ष ॲडवोकेट राहुल नार्वेकर यांनी केली. या अधिवेशनात विधानसभेत 22 शासकीय विधेयकं मंजूर झाली.

**सर्वपक्षीय बैठक**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं काल नवी दिल्लीत सर्व पक्षीय बैठकीचं आयोजन केलं होतं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. विरोधी पक्षनेत्यांच्या सर्व प्रश्न आणि शंकाचं समाधान सरकारनं केलं असून, सर्व विरोधी पक्षांनी या परिस्थितीला  तोंड देण्यासाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांबाबत सरकारला समर्थन देण्याचे आश्वासन दिले आहे अशी माहिती या बैठकीनंतर संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, महत्वाच्या सागरी मार्गात अडथळे निर्माण झाले असून आखाती देशांतल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी या परिस्थितीसंदर्भात संसदेत केलेल्या भाषणानंतर ही बैठक झाली. सरकारने या संघर्षाचा प्रभाव कमी करण्यासाठी इंधन, पुरवठा साखळ्या, खत आणि इतर क्षेत्रांवरील धोरणे विकसित करण्यासाठी सात सशक्त गटांची स्थापना केली असल्याचं पंतप्रधानांनी त्यांच्या भाषणात म्हटलं आहे.

**भाजप यादी**

आगामी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आणखी 19 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये आरजी कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय प्रकरणातील पीडितेची आई रत्ना देवनाथ, उत्तर 24 परगणा मधल्या पनिहाटी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहे. रथिंद्रनाथ बोस कूचबिहार दक्षिण विधानसभा मतदारसंघातून तर डॉ. शंकर गुच्छैत मिदनापुरातून निवडणूक लढवणार आहेत. बिप्लब मंडल हावडा मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

निवडणूक आयोगानं पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी सर्व 294 निवडणूक अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. प्रशिक्षणात निवडणूक निष्पक्ष करण्यावर भर दिला असल्याचं आयोगानं म्हटलं आहे. केरलम मध्ये विधान सभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. आसाम मध्ये उमेदवारी अर्जाची छाननी झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी काल मध्य आसाम मध्ये 3 मोठ्या प्रचारसभा घेतल्या. पुद्दुचेरी विधानसभा निवडणूकीकीच्या प्रचारालाही वेग आला असून प्रमुख नेते विविध मतदार संघांमध्ये जनसंपर्क अभियान राबवत आहेत.

**रामनवमी**

श्रीरामनवमी निमित्त आज देशभरात उत्साह आणि भक्तीचं वातावरण आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीरामांचं  कार्य आपल्याला समाजाप्रती आपली कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रेरित करते, या आदर्शांचं पालन करून जीवन जगण्याचा प्रयत्न करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. देशभरात रामनवमी निमित्त ठिकठिकाणी मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अनेक ठिकाणी चित्ररथांसह शोभायात्रा काढण्यात येणार आहेत. शिर्डी इथल्या श्री साईबाबा मंदिर आणि परिसरात विद्युत रोषणाई तसंच फुलांची आकर्षक सजावट केली आहे.

**खेलो इंडिया**

पहिल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धांना काल छत्तीसगडमध्ये सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन रायपूर मध्ये युवक आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांच्या  हस्ते झालं. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई, उपमुख्यमंत्री अरुण साओ यावेळी उपस्थित होते. या स्पर्धा हा सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रम असून यापुढे दरवर्षी या स्पर्धा छत्तीसगडमध्ये होणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. आदिवासिंमधल्या क्रीडा प्रतिभा शोधून त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी उत्तम प्रशिक्षण देणे हा या स्पर्धेचा उदेश आहे. 3 एप्रिलपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेत ॲथ्लेटिक्स, हॉकी, फुटबॉल, कुस्ती, वजन उचलणे, जलतरण आदि सात क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. रायपूर, जगदलपूर आणि अंबिकापुर या तीन शहरांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत तीस राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांतले तीन हजाराहून अधिक आदिवासी खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, कर्नाटकनं पाच सुवर्ण पदकांसह सात पदक पटकावली. पदक तालिकेत ओडिशा दुसऱ्या क्रमांकावर आहे,

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार